म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३५१२.

...करण

# चडी-शत...



REFBK-0003442
REFBK-0003442

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

काव्यकिरणमाला– किरण ३ रा.

# चंडी–शतक.

REFBK-0003442

लेखक :

दु. आ. तिवारी, जळगांव.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. 38682
शाखा

सं. व प्रकाशक :

मि. का. भोरटके.

जळगांव– खानदेश.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

जानेवारी १९२७

किंमत १२ आणे

पुणें येथें
**आर्यभूषण** छापखान्यांत **अनंत विनायक**
**पटवर्धन** यांनीं छापिलें.

॥ ॐ ॥

# प्रकाशकाचें निवेदन

'काव्यकिरणमाले' चा हा तिसरा किरण प्रसिद्ध होत आहे. चंडीशतक हा दुसरा किरण प्रसिद्ध होणार म्हणून विदित केलें होतें, पण आर्यभूषण प्रेसावर गेल्या मे महिन्यांत जो खेदजनक अग्निप्रलय झाला त्यांतून हें पुस्तक जर बचावलें नसतें तर याच्या प्रकाशनास आणखीही कालावधि लागला असता.

चित्रकाव्य हें या किरणाचें वैशिष्ट्य आहे. प्राचीन कालापासून सत्कवींनीं व साहित्यकारांनीं चित्रकाव्याचा आदर कसा केला आहे तें कवि तिवारी यांनीं आपल्या प्रस्तावनेंत विशद केलें आहे. चित्रकाव्य हें काव्याचें एक अंग आहे. संस्कृतापासून उत्पन्न झालेल्या भाषांत या चित्रकाव्याचा समावेश झाला आहे. मग मराठींत तो कां नसावा ! आधुनिक मराठी काव्याच्या कालांत हा नवा भाग पुढें आला आहे. विद्वान रसिकांच्या दृष्टीला काव्यकिरणमालेचा हा किरण आपल्या नाविन्यानें प्रसन्न करील असा विश्वास वाटतो.

जळगांव म्यु. शाळेमधील चित्रकला-शिक्षक श्रीयुत रा. द. सुतार व त्यांचे मित्र श्री. ध. न. डाळवाले यांनीं या पुस्तकांतील सुंदर आकृति अत्यंत परिश्रमपूर्वक काढून दिल्या याविषयीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत.

आर्यभूषण प्रेसाचा प्रामाणिक सरळ व्यवहार खरोखर प्रशंसनीय आहे.

जळगांव
चंपाषष्ठी शके १८४८. } मि. का. भोरटक्के.

# प्रस्तावना.

भगवती चंडिका ही आमची कुलदेवता होय. या जगन्मातुश्रीवरील भक्तीनें हें ' चंडी शतक ' काव्य लिहिलें. या काव्याचे २ भाग आहेत. पहिला भाग ५२ कवितांचा असून दुसरा ४८ कवितांचा भाग चित्रालंकारांचा आहे. याप्रमाणें या काव्यांत एकूण १०० कविता आहेत म्हणून यास ' चंडीशतक ' हें नांव दिलें आहे.

अर्थालंकार व चित्रालंकार हीं काव्याचीं दोन अंगें आहेत. काव्यप्रकाशांत चित्रालंकराचें लक्षण--

' तच्चित्रं यत्र वर्णानां खड्गाद्याकृति हेतुता '

असें दिलें आहे. जेथें वर्णरचनेच्या योगानें खड्गादिक पदार्थांच्या आकृति साधल्या असतात तेथें चित्र नामक अलंकार जाणावा. असें जरी आहे तरी चित्रकाव्यांत अंतर्लापिका, बहिर्लापिका, वर्णचित्र, गतिचित्र वगैरे पुष्कळच प्रकार समाविष्ट झाले आहेत. अर्थालंकारांपेक्षां चित्रालंकार जरी कमी प्रतीचे मानिले तरी काव्याचा मुख्य उद्धेश जो मनोरंजन त्याला चित्रालंकार पोषक आहेत. म्हणूनच फार पूर्वीपासून मोठमोठ्या सत्कवींनीं चित्रालंकारांचा आदर केला आहे. संस्कृतांतील आद्यकवि जे वाल्मिकी त्यांनीं आपल्या रामायण नामक महाकाव्यांत कांहीं अध्यायांच्या आरंभींच्या अक्षरांत गायत्रीमंत्राचा बंध साधिला आहे. व्यासांनीं अग्निपुराणांत चित्रकाव्याचें विस्तृत वर्णन केलें आहे. श्रीमद्भागवतांतील गोपीगीतांत एक गुणबंध साधिला आहे. ( ज्ञा. को. भा. १३ )

बौद्धकालांत होऊन गेलेल्या वाग्भटानें आपल्या ग्रंथांत चित्रकाव्याचीं लक्षणें दिलीं आहेत. जैनकालांतील अरिसिंहानें रचिलेल्या काव्यकल्पलता ग्रंथांत चित्रकाव्याची विविध माहिती देऊन खड्गबंध, गोमूत्रिकाबंध, मुरजबंध

वगैरे चित्रबंध रचून दाखविले आहेत. भोजकृत सरस्वतिकंठाभरण व दंडी-कवीकृत काव्यादर्श या दोन ग्रंथांत चित्रकाव्याचें अनेक प्रकारें वर्णन केलें आहे. दंडीनें लिहिलेल्या दशकुमार-चरित या आपल्या ग्रंथाचा ७ वा उच्छ्वास निरोष्ठ साधिला आहे. कालिदासकृत रघूच्या ९ व्या सर्गांत देखील चित्रकाव्याचाच प्रकार आहे. माघ कवीचें शिशुपालवध काव्य, व्यंकटाध्वरीचें लक्ष्मिसहस्र काव्य आणि भारवीचें किरातार्जुनीय काव्य यांची महाकाव्यांत गणना होते. या तिन्ही काव्यांत त्या त्या महाकवींनीं एकेक सर्ग चित्रकाव्याकरितां खर्ची घातला आहे. रामकृष्णविलोम काव्य, राघवपांडवीय काव्य व विदग्धमुखमंडन हे तर चित्रालंकारांचे स्वतंत्रच ग्रंथ संस्कृतांत आहेत.

आतां साहित्य-शास्त्रज्ञांकडे वळूं. आठव्या शतकांत झालेला साहित्य-शास्त्रज्ञ वामन यानें यमक व अनुप्रास हे दोन शब्दालंकार व २५ अर्थालंकार वर्णिले आहेत. नवव्या शतकांत होऊन गेलेला अलंकारज्ञ रुद्रट यानें ५ प्रकारचे शब्दालंकार व ६६ प्रकारचे अर्थालंकार वर्णिले आहेत आणि ११ व्या शतकांतील अलंकार-शास्त्राचा प्रसिद्ध मर्मज्ञ व भावभूषित काव्यप्रकाशकाचा कर्ता मम्मट यानें ६ शब्दालंकार व ६१ अर्थालंकार मानिले आहेत. साहित्यदर्पणाचा कर्ता कविराज विश्वनाथ यानें तर मम्मटापुढें जाऊन " भाषासम " हा सातवा-अलंकार मानिला आहे. शब्दालंकार हा चित्रालंकारांतीलच भाग आहे.

मराठींत चित्रकाव्य पाहूं जातां विठ्ठल कवीनें रचलेल्या रुक्मिणी-स्वयंवर काव्यांत आढळतें. त्यांत त्यानें पुष्कळ बंध साधिले आहेत. शिवाय 'षण्मासिचा वायदा' म्हणून जीं कूटें आहेत त्यांच्या शेवटींही विठ्ठल कवीचें नांव आढळतें. त्यानंतर चित्रकाव्याचें बरेंच विस्तृत स्वरूप मोरोपंतांच्या काव्यांत दिसून येतें. परंतु-रामायण, निरोष्ठ-रामायण, नामगर्भ रामायण, सीतारामायण, मंत्र-रामायण असे अनेक चित्र-काव्याचे ग्रंथ पंतांनीं लिहिले आहेत. व कांहीं आकृतिबंधही साधिले आहेत. अलीकडील काळांत पाळंदे, गोडबोले, व तळेकर शास्त्री यांनीं आपल्या काव्यांत चित्रालंकाराचे कांहीं प्रकार आणिले आहेत. बजाबा बाळाजी नेने ह्यांनीं आपल्या सैरंध्री नाटकांत चित्रकाव्याचे बहुतेक प्रकार साधिले आहेत.

चित्रकाव्याच्या वरील इतिहासाकडे पाहिलें असतां असें लक्षांत येईल कीं, ज्या ज्या कवींनीं चित्रकाव्यें लिहिलीं त्यांनीं आपली सर्व कविताशक्ति

त्याच कार्यास न लाविता आपल्या एकंदर काव्योद्यानांत चित्रालंकारांचीं मनोहर कारंजीं मात्र निर्माण केलीं. चित्रकारानें एखादें सुंदर चित्र काढून त्या भोंवतीं वेलबुट्टी किंवा नक्षी काढिली तर तें चित्र मनाला अधिक रमवितें. सुवासिनींनीं सडा घातल्यानंतर त्यावर काढिलेल्या रांगोळींनीं अधिक शोभा येते. लग्नकार्यादि समारंभांत घातलेल्या मंडपाभोंवतीं लाविलेल्या झालरींचा, गृहापुढें बांधिलेल्या तोरणांचा व कदलीस्तंभांचाही उद्देश शोभेचाच असतो. मिरवणुकीचा जो गज त्याच्या मस्तकावर रंग–रेखांनीं चित्रता प्रगट केलेली असते. कवींच्या काव्यांतील चित्रालंकारांकडे विद्वान साहित्यभक्त या दृष्टीनें पहात असतात.

परमेश्वर–निर्मित विश्वकाव्यांत देखील आपणास चित्रकाव्याची मौज पाहून आनंद होत नाहीं काय? एकीकडे नद्यांचे शांत व गंभीरप्रवाह तर त्यांतच दुसरीकडे नायगारा, गोकाक सारखे जलतुषारांनीं चित्रविचित्र दिसणारे धबधबे, अनंत नीलाकाश आणि त्यांत मधून मधून दृश्य होणाऱ्या मनोहर इंद्रधनुष्याच्या कमानी, विस्तृत वसुंधरा आणि तिजवर पसरलेले नवशाद्वलांचे विविध रंगपट, गगनभेदी हिमालयाचीं शिखरें आणि त्यावर चकाकणोर धवल हिमराशी हे ईश्वराच्या विश्वकाव्यांतील चित्रालंकाराचेच नमुने होत.

चित्रकाव्याचे शब्दचित्र व अर्थचित्र असे २ भेद आहेत. ज्यांत वर्ण, मात्रा, स्थान, गति इत्यादिकांच्या संबंधानें कोणत्याही प्रकारें रसिकांस आनंद-दायक चमत्कृति निर्माण केलेली असते त्या काव्यरचनेस शब्द–चित्र म्हणतात. याचे ६ प्रकार आहेत. स्वरचित्र, वर्णचित्र, स्थानचित्र, आकारचित्र, गतिचित्र आणि बंधचित्र.

अर्थरचनेसंबंधानें केलेला चमत्कार जेथें दृष्टास पडतो तेथें त्यास अर्थ-चित्र म्हणतात. यांत अंतर्लापिका, बहिर्लापिका, कर्तृगुप्त, कर्मगुप्त, क्रियागुप्त, वर्णभेद, मात्राभेद इत्यादिकांचा समावेश होतो. या पुस्तकांतील चित्रका-व्याचा पहिला व शेवटचा मिळून २४ कवितांचा भाग सामान्यतः अर्थ चित्रांत समाविष्ट होईल. व मधले २४ चित्रबंध हे आकारचित्र, बंधचित्र, गतिचित्र या शब्दचित्रांच्या विभागांत समाविष्ट होतील.

ज्या ज्या चित्रकाव्याचें स्पष्टीकरण करणें इष्ट होतें त्यांचें त्यांचें त्या त्या स्थळीं तें पूर्णतेनें केलें आहे. कांहीं स्थळीं शब्दार्थही दिले आहेत. बंधाकृतींच्या खालींच श्लोक दिले आहेत, त्यावरून आकृतींत ते श्लोक कोणत्या क्रमानें वाचावे हें सहज कळेल. हे बंधाकृतींचे श्लोक फारसे दुर्बोध नाहींत म्हणून त्याचा अर्थ देऊन विस्तार केला नाहीं. त्यांतील वैशिष्ट्यें व साध्यें हीं मात्र दाखविलीं आहेत.

कार्तिक व० १४ शके १८४८ }
जळगांव. } **दु. आ. तिवारी.**

ग्रं. क्र. 3842

# चंडी-शतक.

( शिखरिणी )

१

हिमाद्रीची बाला शिवविभु-मनोहारिणि उमा,
जगन्मातुश्रीची समुचित असे जीस उपमा.
क्षमादात्री भक्तांकित महिषदुर्दैत्यहननी,
तया कल्याणीचें शुभकर वसो नाम वदनीं.

२

जयांच्या पुण्याचें अमृतकर हा तेज पसरी,
तसें यत्कीर्तीचें जलनिधि यशोगायन करी;
अशा स्वर्गीयांनीं तव चरण जे देवि ! नमिले;
तयां भावें ध्यावें जननि ! मम कर्तव्य पहिलें.

३

शिवाचे विष्णूचे भजक परयात्रेस निघती
विमानीं स्थापोनी हरि-हर-पुरीं दूत वळती
समर्थे ! त्वद्दासास्तव न गणमाला तुज हवी
सुटे जों भक्तात्मा अयि ! मिळावि निर्वाण-पदवी !

४

गणेशाची ख्याती कठिणतर विघ्नोपशमनीं.
रमेशाची ख्याती भजकरुचिरेच्छा-वितरणीं.
करी मार्कंडेया सुखि, शिव, यमातें निरउनी.
तुझ्या कर्तृत्वीं या सुलभ असती गोष्टि जननी

५

सुधा शुभ्रा, तेशी अमरजन-सेव्या तुजपरी
असे माते ! तीचा 'विष-भगिनि' हा लौकिक परी
सुधा सेवायाला मम मन भवानी नच वळे
मिळे जो त्वन्नामें भगवति तिनें मोक्ष न मिळे

६

सुरेशाला श्वेत द्विरद तरि कां सेव्य गमला ?
विधात्याला तैसा धवलतर कां हंस रुचला ?
कुणी सांगो कांहीं मजसि गमतें कारण भलें,
यशोवर्णे तूझ्या उभय गिरिजे ! देव भुलले !

७

मिळावीं या लोकीं सकल धनदारादि विभवें
मिळावें अंतींही अमरनगरींचें सुख नवें
अशा वांछा ज्यांना इहपर सुखाच्या उपजती
तुझ्या द्वारीं त्यांचे अभिनव मनःकाम पुरती

८

जसा पक्षी पक्षाविण, गज जसा दंताविहेन
फलावांचोनी कीं तरु, तनु जशी नष्टनयन
विराजे तें तेजाविण न विधुचें बिंब अगदीं
न शोभे प्राणीही स्मरण न करी जो तव कधीं

९

किती स्वार्थासाठीं श्रमति जन येथें जडमती
मिती नाहीं त्यांची, सतत अवलीलेंत रमती
मतिश्रेष्ठे ! ते गे ! तव पद-सरोजीं न नमिती
मति-भ्रष्टा जेवीं, गति मिळविती तेविं कुमती

१०

किती आधि-व्याधि-ग्रसित हतदैवी विचरती
मतीला कां त्यांच्या समुचित घडे ना उपरती ?
रती थोडीही ते जरि तव यशोगानिं वरिती
क्षितीमाजी त्यांतें ! करिशिल सुखी तूं भगवती !

११

निघे ऐश्वर्यानें कनक-शिबिकारूढ नृपती
पदीं ज्याच्या सारे अधिप मुकुटांतें लवविती
' स्वबाहूनें लाधे विभव ' नृप ऐसें समजतो
कृपेची ती आहे तव महति मी सत्य गणितों

१२

तपश्चर्या-प्रेमी जंव हर न झाला तव पती
तदा निष्कारुण्यें रतिपतिस दे दुर्धर गती
पुढें त्वत्सान्निध्यें सदय शिव दे त्यास सु-गती
कृपाळू तूं केला पति निजगुणानें गुणवती

१३

तपानें त्वां पाणिग्रहण-पर केला पशुपती
तयें कामालागीं पुनरपि दिला देह जगतीं
तदा त्याचा बंधू रजनि-पति जों मंद हंसला
प्रभा ती, कीं ज्योत्स्ना, तव सुयश कीं, गूढ मजला !

१४

शनीची भौमाची वदति मतिमान् क्लेशमहती
नुरे त्यांची पीडा परि तव दयालोकन-पथीं
खगश्रेष्ठाचें गे ! भय जरि फणींद्रास असतें
तरी श्रीविष्णूच्या जवळिल न शेषास गमतें

१५

तुझ्या प्राप्तीसाठीं गिरिगुहिं तपःसिद्धि करिती
कुणी नीर प्राशी, कुणि पवन सेवून वसती
अम्हां भक्तांलागीं सुलभ परि लाधे तव दया
नदीच्या कांठीं जे विटप वसती, प्राशिति पया

१६

तमातें संहारी रवि, पवन मेघांस फिरवी
जशी दिव्या मात्रा झणि अमित रोगांस पळवी
करींद्राचे किंवा हरि पळवितो यूथहि जसे
स्वभक्तांचीं विघ्नें हरि तव कृपा-वीक्षण तसें

१७

उषा जेव्हां व्योमीं अरुणमय कांतीस पसरी
तदा कल्याणी ! तूं उतरलिस वाटे महिवरी
समुत्कंठें शय्या त्यजुन जंव पूर्वेस बघतों
निराशेचा गेला दिवस नयनीं तोच दिसतो

१८

प्रभातीं सूर्यांचे किरण हृदयाल्हादक जसे;
असे का सौभाग्ये ! तव नव दयालोकन तसें ?
असे का शीतांशूसम निरत शांतिप्रद तरी ?
कसें सांगूं ? नाहीं अनुभव दिला त्वां अजवरी !

१९

बघावें औत्सुक्यें कुवलय-दलांना निरखुनी
तवापांग-भ्रांति क्षण रमवित गे ! तंव मनीं
मधाच्या लोभानें नव मधुकर-श्रेणि फिरते
कटाक्षाची भ्रांति क्षण चकित बुद्धीस करिते.

२०

त्वदास्य प्रेक्षोनी वरि शिशिरता देवतटिनी
तसा त्वद्वत्काचा विधु धवलिमा घेइ वदनीं
कटाक्षाची नील द्युति गगनही स्वीकृत करी
दिसेल क्षेमांगे ! वदन तव ऐसें कधिं तरी ?

२१

नभोगंगा नोहे, कुचवसन वाटे सरकलें
शशी नाहीं हा गे ! स्तन, अमृत ज्याच्यांत भरलें
मधें नाहीं डाग, स्तनमुख दिसे कृष्णनिभ तें
न ही जोत्स्ना माते ! तव कुच-पयोवृष्टि गमते

२२

वळे गंगा लोकीं सगरतनयोद्धारिणि यदा
वसे श्रीकंठाच्या शिरिं, उचित जी श्रीपति-पदा
पहा वाहे पृष्ठाकडुन परि येई न पुढतीं
श्रुतिज्ञांच्या अंकीं रुचिर गृहिणी मात्र वसती

२३

असे सेव्या तापी, तिजपरिस रेवा सुविहिता
तिच्यापेक्षां गोदावरि, तिजहुनी सूर्य-दुहिता
तिच्याहूनी गंगा, परि अधिक तूं गे ! तिजहुनी
शिवें केलें आधीं म्हणुनिच तुझें सेवन जनीं

२४

'पहा आई ? मातें गुह मुख करी वक्र , ह्मणवी, '
'अगे ? माते आधीं ब्रह्मुमुख वदे , हाच ह्मणवी '
तुझ्या गालीं येई तनय-कलहें हास्य-लहरी
अम्हां भक्तांचें ती हिमनगसुते ! मंगल करी

२५

किरीटातें शीर्षीं निगटित करी संगरवती
सजे शस्त्रास्त्रांनीं असुरबल-संहारिणि सती
मधु प्राशी जों मी, करि तंववरी घोष असुरा ?
अशी ती त्वद्वाणी अजुन रमवी कर्ण-विवरा

२६

स्वरूपें ‘ चामुंडा ’ वदति अथवा ‘ भैरवि ’ कुणी
‘ भवानी ’ ‘ रुद्राणी ’ म्हणाति कुणि ‘ काली ’ तुज जनीं
महामाया तूंच त्रिभुवनकृपाकारिणि खरी
म्हणोनी हीं झालीं प्रकट तव रूपें कितितरी

२७

उडी घेशी जेव्हां चपलतर वेगांत चपले !
कला त्वद्वेगाची रजनिचरही अल्प शिकले
विजेच्या संगानें जरि तरलही मेघ फिरती
न ये देखादेखी गुणचतुरता गे ! गुणवती !

२८

तुझ्या त्या आवेशें गगनचर-यानें सरकलीं
सुमें वेणींतूनी अमरयुवतींचीं विखुरलीं
नभोगंगातीरीं पडुन वरतीं तीं तरळतीं
जयां ‘ तारा ’ ऐसें सकलही मही-लोक वदती

२९

प्रवेगें तूं होशी चालित, अरिसैन्यें विचलतीं
प्रकोपें तूं लोला, रिपुहि लुलितप्राय दिसती
रणाचा त्वत्कंप द्विषद बघतां कांपति मनीं
दिसे त्वत्सत्वाचा प्रभव रिपुच्या सत्वदमनीं

३०

तिरस्कारें केलें हसितमुख संग्रामकुशलें !
समालोकोनी तें असुरललना-नेत्र भरले !
अहा ! अश्रूसंगें रुचिर पुसले भाल-तिलक !
अवैधव्यीं दुःखें रडाति किति तोडीत अलक !

३१

निशुंभातें केशीं धरुन चरणीं शुंभ रगडी
विचूर्णा होतांना कड कड करी तैं बरगडी
मुखें तो हुंकार ध्वनि करुन जों खड्ग उभवी
अहा तों मोक्षाची दिधलि अपकाऱ्यास पदवी !

३२

बघे तिर्यक्नेत्रें करधृत खलाच्या चळवळी
अपूर्णा जी होती घटि, ह्मणि तदीयाहि भरली
यदा तूं मातोश्री मुखरमय मुंडास वधिलें
तुझ्या सिंहानेंही प्रबलतर चंडास हरिलें

३३

तुझ्या शस्त्राघातें अवनिं पडतीं राक्षस-शिरें
रडावीं तीं दुःखें, नवल परि त्यां मोदचि भरे
जिच्यासाठीं योगी ऋषि तप करायास झटती
तिच्या हातें आलें मरण तरि संप्राप्त सुगती

३४

शिरोमाला कंठीं, नररुधिर-संसिक्त शरिर
स्वरूपातें तूझ्या अखिल नमिताती सुरवर
गळाले मोदाश्रू सकल अमरांचेहि नयनीं
तयांची ही वाहे विमल बघ आकाशतटिनी

३५

उठे स्वर्गीयांचा गजर इतुका स्वर्ग-भुवनीं
रमेशाला झाला स्मय अति बालिद्वार-सदनीं
'चतुर्मासांचा हा अवधि सरला केविं न कळे ?
अजोनी मी येथें, मुदित सुर हे केविं सगळे ?'

३६

समाधी शंभूची उतरुन, पुशी नेत्रयुगुलां
पुसे शृंगीभृंगीप्रति-'गगनसंघोष कसला ?'
कळोनी आलें कीं, कुशलवति दैत्यास निवटी
निवाराया पापी समुचित जगन्नाटक-नटी

३७

परंतापी, स्वीयां शुभकर, महेश-प्रियतमे !
अशा त्वद्रूपाच्या स्मृतिसहचि चिंताज्वर शमे
तुला बाहोनीया जननि मम गे ! कंठ सुकला
कधीं घेशी अंकावरति ? पुसतों सांग मजला

३८

विवेकाभावानें विहित शुचिकर्मं न करितां
विकर्माचारी ही मम मति बने स्वैर पतिता
अतां पश्चात्तापें जळुन, तव सेवार्थ वळली
दया देवी तूझ्या विमल ह्रदयीं फार भरली

३९

तुला सोडोनी मी कितिक मतिहीनांस भजलों
वृथा या जिव्हेनें स्तुति करुनिया मात्र शिणलों
मनोभावें केव्हां तव न गुणगानास वळलों
नको कोपूं, घेई जवळ, तव मी पुत्र ठरलों

४०

कथा नाना ओष्ठीं अनृत वदुनी दुस्तुति-पथा
यथा गेलों लोकीं; 'नरभजक' मत्कीर्तिहि तथा
वृथा उन्मार्गानें श्लथित करि मी मानस-रथा
कथायाला आलों तुजजवळ आतां रडकथा

४१

उमे! अल्पज्ञानी धरणिपति काव्यीं स्तवियले
प्रशंसेनें त्यांच्या मम मुख अपभ्रष्ट बनलें
तयाची संशुद्धी तव सुगुण गाऊन करितों
चुके कोठें देवी! तरि पदर हा मी पसरितों

४२

नृपाळांच्या खोट्या निरसभजनीं नित्य रमलों
बघोनी तत्कोपा, मनिं अचलजे! हंत! वदलों
कुभांड्यांचीं कृत्यें विवश करिती जैं जनिं मला
तदा देई धीर स्थिर तव दया-लौकिक मला

४३

कुबेराचीं स्तोत्रें जरिहि रचिलीं श्राव्य-कवनीं
सभास्थानीं त्यातें परिसविलि सोत्कंठ वदुनी
करायाला त्याला बल न मम दारिद्र्य-हनन
कटाक्षानें तूझ्या वरिल वसती तें क्षणहि न

४४

क्षमादात्री तूं, मी बहुत अपराधीहि असलों
अघाची हंत्री तूं, जरि विविध पापांत भरलों
अनाथस्नेहाळे! मज न दुसरा आश्रय, तरी-
तुझ्या ठायीं आलों शरण शुभगे! तारण करी.

४५

सुवर्णाच्या कांचीमय कटिस घालून विळखा
बघे कारुण्यानें अनिमिष तुझ्या प्रेमळमुखा
नको सोडूं आई ! करिं न झिडकारी निजसुता
कथायाला कोणाजवळ मजला लाविशि कथा

४६

तरायातें आहे भवजलनिधी दुस्तर महा
बुध ज्ञानी योगी किति अनुभवें बोलति अहा !
कृपारूपी लाधे अचल-दुहिते ! नाव न जरी
तरावा हा कैसा वद मग तुझा सेवक तरी ?

४७

समुद्धारायातें असति सुर कोट्यावधि जरी
तुझ्या ठायीं माझा अविचल मनोभावचि परी
लपूं दे पाठीशीं विकल तुझिया दुर्बल जना
शरण्ये ! जाऊं गे ! तुजविण कुणा सांग शरणा

४८

चुकोनी गेलेला शिशु जन-समूहांत फिरतो
परंतु प्रेमाच्या जननिविण तो मात्र रडतो
तसा मीही माते ! विकल तुझियावीण अगदीं
तुझ्या वात्सल्याची मजवरि वळो निर्मल नदी

४९

निघालों, गेलों मी जरि विमल भागीरथि-जलीं
तनुस्नानीं ' गंगे ! हर मम अघं ' वाणि वदली
तरी मूर्ती नेत्रीं हररमणि येईल तवची
वसे चित्तीं माता, शिशु जरि कुणा बाहिल वचीं

६२८

५०

जयांना सोडोनी तव चरणिं मी भाव धरिला
तयांनीं गेलेला अवगतिस हा देह बघिला
तरी माते ! मातें हसतिल हसोत क्षणभरी
तुझें होतां मिथ्या यश, मज न तें साहिल परी

५१

जरी मृत्युद्वारीं तनु शिथिल होऊन पडली
जरी अंतीं गात्रीं लवहि गिरिजे ! शक्ति नुरली
कफत्रासें कांहीं अडखळत बोलेन वचनीं
तदाही मांगल्यप्रद तव वसो नाम वदनीं

५२

सभा जिंकायातें वचनपटुता याचिति कुणी
कुणी भोगी मागे अमरयुवती-तुल्य रमणी
प्रसादाचा आहे सतत वरती हात वरदे !
कुणाला दे कांहीं, परि चिर-कृपा मात्र मज दे ?

---

# " चित्रालंकार "

## समस्यापूर्ति

### समस्या

' उमा पार्वती शूलिकांता भवानी '

विधीला सुर प्रार्थिताती मिळून
निवारील दुर्दैत्य-तापास कोण ?
विधाता वदे शब्द चारी मुखांनीं
' उमा, पार्वती, शूलिकांता, भवानी ' ॥ ५३ ॥

**खुलासाः—**

समस्येंतील चारी नांवें देवीचींच आहेत म्हणून समस्यापूर्ति करितांना ३ ओळींत सर्व देव विधात्याकडे कां गेले वगैरे सांगून उत्तरार्धीं ब्रह्मदेवाच्या चारी तोंडांतून देवीचीं चार निरनिराळीं नांवें वदविलीं आहेत.

---

# अंतर्लापिका.

## प्रकार १ ला.

देवींत कोण स्तवनीय देवी ?
कैसें तिचें सेवक नाम सेवी ?
सद्यः फलेच्छा पुरती कशानें ?
श्रीचंडिका-संतत-भक्तिगानें ॥ ५४ ॥

**खुलासा:—**

चौथ्या ओळींत जीं ३ पदें आहेत. त्यांतील प्रत्येक पद अनुक्रमानें १।२।३ या ओळींतील प्रश्नाचें उत्तर आहे. आणि तिसऱ्या ओळीचें उत्तर समास-घटित अशी सबंध चौथी ओळ आहे.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ देवींत कोण देवी स्तवनीय ? | श्रीचंडिका |
| २ सेवक तिचें नाम कैसें सेवी ? | संतत |
| ३ सद्यः फलेच्छा कशानें पुरती ? | भक्तिगानें |
| ४ सद्यः फलेच्छा कशानें पुरती ?— | श्रीचंडिकासंततभक्तिगानें. |

---

# अंतर्लापिका.

## प्र. २ रा.

**कोण श्लाघ्योत्तम रघुकुलीं ? योग्य योग्यास काय ?**
**न्यायी कैसा ? प्रणयि वरिती कोणता आत्मभाव ?**
**नाशी काय द्युमणि ? रतितें कोण भोगी ललाम ?**
**चंडी–रूप प्रकटित कसें ? "राक्षसप्रेतकाम" ॥ ५५ ॥**

**खुलासा:—**

पहिल्या ३ ओळींत एकुण ६ प्रश्न आहेत. चौथ्या ओळींतील अंत्य सामासिकशब्द 'राक्षसप्रेतकाम' यांतील शेवटचा वर्ण 'म' स्थिर ठेवून त्याला या सामासिक शब्दांतील प्रत्येक वर्ण अनुक्रमानें लाविला म्हणजे प्रत्येक प्रश्नाचें अनुक्रमानें उत्तर येतें. शिवाय ४ थ्या ओळींतील प्रश्नाचें उत्तर 'राक्षस-प्रेतकाम' हें आहेच.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ रघुकुलीं श्लाघ्योत्तम कोण ? | राम |
| २ योग्यास काय योग्य ? | क्षम ( शांति ) |

| | |
|---|---|
| ३ न्यायी कैसा ? | सम ( सारखा ) |
| ४ प्रणयी कोणता आत्मभाव वरिती ? | प्रेम |
| ५ द्युमणि ( सूर्य ) काय नाशी ? | तम ( अंधार ) |
| ६ कोण ललाम रतिनें भोगी ? | काम ( मदन ) |
| ७ प्रकटित चंडी-रूप कसें ? | राक्षसप्रेतकाम[१] |

---

# अंतर्लापिका

## प्र. ३ रा.

### ( अनुष्टुप् )

चंडासुरा कोण दंडी ?
कामदा कोण ती भली ?
उपकारिणि कोण रामा ?
प्रश्नांतचि उत्तरें ॥ ५६ ॥

**खुलासाः—**

प्रत्येक ओळींतील प्रश्नाचें उत्तर त्या त्या ओळींतील आद्यंत अक्षरांच्या जुळणीनें तयार होतें.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ चंडासुरा कोण दंडी ? | चंडी |
| २ कामदा कोण ती भली ? | काली |
| ३ उपकारिणि रामा कोण ? | उमा |

---

१ राक्षस-प्रेतेच्छु.

# अंतर्लापिका

## प्र. ४ था.

( अनुष्टुप् )

दानी[1] ख्यातीस ने काय ?
न शिवे कोण दास्य ती ?
वनान्तींही कोण सेव्या ?
कुल-स्वामिनि-चंडिका ॥ ५७ ॥

**खुलासा:—**

ही अंतर्लापिका पहिल्या प्रकारचीच आहे. म्हणजे पहिल्या ३ चरणांतील प्रत्येक प्रश्नाचें उत्तर चौथ्या ओळींतील अनुक्रमानें येणाऱ्या एकेक शब्दांत आहे, शिवाय तिसऱ्या ओळींतील प्रश्नाचें उत्तर संबंध चौथी ओळ आहे.

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ दानी ख्यातीस काय ने ? | कुल |
| २ ( जी ) दास्य न शिवे, ती कोण ? | स्वामिनी |
| ३ वनान्तींही कोण सेव्या ? | चंडिका |
| ४ वनांतींही कोण सेव्या ? | कुलस्वामिनिचंडिका |


**शिवाय—**

ही अंतर्लापिका पुढील चक्रचंर्यांतही बसविली आहे.

---

१ दाता

# चक्र बंध



दानी ख्यातीस ने काय, ? न शिवे कोण दास्य ती ? ।
वनान्तींही कोण सेव्या ? कुल-स्वामिनि-चंडिका ॥.

साध्य-दानव-कुल-नाशिनी ( वर्तुळांतील वरील दोन त्रिकोण ).

पहा.

## " बहिर्लापिका "

ग्रीष्मीं सूर्य कसा ? सभापति कसा ? तो कोण सीता हरी ?
लोभ्याला प्रिय काय नित्य ? वसतो तो काय पुष्पांतरीं ?
ज्ञानी आत्ममुखें न काय कथितो ? अभ्रेंदु भासे कसा ?
मत्प्रश्नोत्तरमध्यमाक्षरपदीं ये शांतता मानसा ॥ ५८ ॥

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ ग्रीष्मीं सूर्य कसा ? | प्र चं ड |
| २ सभापति कसा ? | पं डि त |
| ३ तो कोण सीता हरी ? | लं के श |
| ४ लोभ्याला प्रिय काय नित्य ? | क न क |
| ५ वसतो तो काय पुष्पांतरीं ? | आ मो द |
| ६ ज्ञानी आत्ममुखें काय न कथितो ? | स्व स्तु ति |
| ७ अभ्रेंदु कसा भासे ? | वि ते ज |

**खुलासा:—**

उत्तरांतील मध्याक्षरें अनुक्रमानें जुळविलीं म्हणजे—

" चंडिके ! नमोस्तु ते "

हें साध्य स्पष्ट दिसतें.

---

## " मात्राभेद "

( अनुष्टुप )

नाकाला सुखदा जेशी । देवमस्तकभूषिता
काम-प्रबोधिनी सेव्या । कलिका कालिका तशी ॥ ५९ ॥

**खुलासा:—**

कलिका ( कळी ) कालिका ( देवी ) दोहोंना कावेतेंतील विशेषणें सारखीं लागतात, फक्त 'क' आणि 'का' एवढाच दोहोंत मात्राभेद आहे.

| कालिका | कलिका |
| --- | --- |
| १ नाकाला ( स्वर्गाला ) सुखदा<br>२ देवमस्तकभूषिता = देवांनीं जिला मस्तकांनीं वंदिलें<br>३ कामप्रबोधिनी = मदनाला ( शंकराकडून ) जीवविणारी | १ नाकाला ( नासिकेला ) सुखदा<br>२ देवमस्तकभूषिता = देवाच्या मस्तकावर शोभणारी<br>३ कामप्रबोधिनी=कामोद्दीपक. |

## " वर्णभेद "

( अनुष्टुप )

सुखदा कंठसेव्या ती
सद्यशोगंध-मोहिनी
तवि दामोदरी शोभे
कालिका मालिका जनीं ॥ ६० ॥

**खुलासा:—**

कालिका ( देवी ) आणि मालिका ( पुष्पहार ) यांना कवितेंतील विशेषणें सारखीं लागतात. दोहोंत फक्त 'क' आणि 'म' एवढाच वर्णभेद आहे.

| कालिका | मालिका |
| --- | --- |
| १ सुखदा | १ सुखदा |
| २ कंठसेव्या = गायनोचिता | २ कंठसेव्या=गळ्यांत घालावयास योग्य |
| ३ सद्यशोगंधमोहिनी = कीर्तिरूप गंधानें मोहविणारी | ३ सद्यशोगंधमोहिनी = यशोरूपी सुवासानें मोहविणारी. |
| ४ दामोदरी = कमरपट्टा धारण करणारी | ४ दामोदरी = सूत्रांत गुंफलेली. |

## " वर्णच्छेद "

### ( अनुष्टुप )

' अमृतपावनि ' देवि ! ' अपांसुला ' ॥
' अकुटिला ' गमतेस ' अचंचला ' ॥
' कमलधारिणि ' त्वत्समही सती ॥
प्रथमवर्ण-विहीन सपत्नि ती ॥ ६१ ॥

**खुलासा:—**

हे देवि, तुझी सपत्नि ( गंगा ) तुझ्यासारखीच आहे पण तुझ्या विशेषणाचा आद्यवर्ण काढून टाकला म्हणजे तिचें विशेषण राहतें.

| देवि | गंगा |
| --- | --- |
| १ अमृतपावनि = अमृत प्राशणारी | १ मृतपावनि = मृताच्या अस्थि गंगेंत पडल्या म्ह. ते स्वर्गास जातात. |
| २ अपांसुला = साध्वी | २ पांसुला = सिकतामय |
| ३ अकुटिला = सरला | ३ कुटिला=वक्र वक्र मार्गानें वाहणारी |
| ४ कमलधारिणी = करकमला | ४ मलधारिणी = जिच्यांत गाळ आहे अशी |
| ५ अचंचला = स्थिरमती | ५ चंचला = प्रवाह-चंचला. |

## " कर्तृगुप्त "

### ( आर्या )

पशुपतिदयिते ! दुर्गे ! दानव-समरांत साह्य तुजसि करी ॥
राहून नित्य जवळी स्वामिनिला सेवितात पदधारी ॥ ६२ ॥

**खुलासाः—**

पहिल्या चरणांत दुर्गे ! या विशेष्याचें पशुपतिदयिते ! ( शंभुललने ! ) हें विशेषण भासतें व त्यामुळें करी या क्रियापदाचा कर्ता आढळत नाहीं, पण ' पशुपति ' ( सिंह ) हा शब्द निराळा केला म्हणजे करी या क्रियापदाचा तोच कर्ता ठरतो.

पशुपति-शंकर
पशुपति-सिंह ( हा कर्ता आहे ),

---

## " कर्मगुप्त "

### ( अनुष्टुप )

नगतनया अतिप्रेमें-
संरक्षी त्र्यंबकेश्वरी
कर्म स्पष्ट इथें आहे,
भ्रमती बुध कां तरी ? ॥ ६३ ॥

**खुलासाः—**

नगतनया ( हिमाचलाची कन्या पार्वती ) त्र्यंबकेश्वरी अतिप्रेमें संरक्षी. पण कोणाला ? तें कर्म सांपडत नाहीं.

त्र्यंबकेश्वरी ( पार्वती ) न-गत-नया ( गेला नाहीं न्याय ज्यापासून अशा भक्ताला ) अतिप्रेमें संरक्षी. असा अर्थ जाणावा ' न-गत-नया ' हें कर्म आहे.

---

# " क्रियागुप्त "

## ( अनुष्टुप )

हराप्रिये ! उमे ! जें जें । कुजन-स्तुति-पाप तें
त्याला मल जरी देहीं । माता दे सुतशुद्धितें ॥ ६४ ॥

**खुलासा:—**

हराप्रिये ! हें ' उमे ' या शब्दाचें साहजिक विशेषण भासतें, त्यामुळें पहिल्या दोन ओळींत क्रियापद आढळत नाहीं. पण ' हर ' हें पद विभक्त केलें म्हणजे तेंच क्रियापद ठरतें.

१ हर = शंकर.
२ हर = हरण कर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3412
शाखा

# " व्युत्क्रम "

कशीहि वाचा तरि ' कालिका ' तूं
मदीय हा त्वद्भजनांत हेतु
' रमा ' करी व्युत्क्रम ' मार '-बाधा
स्तवूं कसा देवि तदीय पादा ॥ ६५ ॥

**खुलासा:—**

हे देवि ! तुझें ' कालिका ' हें नांव उलट वाचलें तरी तें स्थिर आहे म्हणून मला तुझें भजन करावेंसें वाटतें.

रमा म्ह. लक्ष्मी तिचें चरण कसें सेवूं ? तिचा ( रमा शब्दाचा ) व्युत्क्रम ' मार ' ( मदन ) पीडा देतो !

# " यमक-चित्र "

स-दानवा जी बहुधा रणांत ॥
सदा नवा जी बहु-धारणांत ॥
सदाशिवातें स्तन-नाभि-रम्या ॥
सदा शिवा ते स्तननाभिरम्या ॥ ६६ ॥

**खुलासा:—**

यांत पहिली व दुसरी त्याच प्रमाणें तिसरी व चौथी आळ सारखी आहे.

**अर्थ:—**

१ जी ( देवी ) बहुधा रणांत स-दानवा ( दैत्यांनीं युक्त-वेष्टिलेली, )
२ जी ( देवी ) बहु-धारणांत म्ह. बहुतांचें पालनपोषण करण्यांत सदा ( नेहमीं ) नवा ( उत्साहिता )
३ ती देवी, सदाशिव जो शंकर त्याला स्तन आणि नाभी यांनीं रमणीय भासणारी आहे.
४ ते शिवा ( ती देवी ) युद्धांतील स्तनन म्ह. गर्जना, त्या गर्जनेनें अभिरम्य भासणारी अशी आहे.

---

१ स-दानवा = दैत्यांनीं युक्त.
२ धारण = पालन-पोषण.
३ शिवा = पार्वती, देवी.
४ स्तनन = गर्जना
५ ते = ती.

# " यमक-चित्र "

२

माया-मती देव-सुधा-विहारी ॥
मा ! या मती दे वसुधा-विहारी ॥
शिवास जे अक्ष-रसावधाना ॥
शिवा सजे अक्षर-सावधाना ॥ ६७ ॥

## खुलासा:—

नं. १ या यमकचित्राप्रमाणेंच यांतीलही १।२ व ३।४ हीं चरणें सारखीं आहेत.

## अर्थ:—

१ हे वत्सलवती व देवामृतप्राशिनी मातोश्री !
२ या दासाला वसुधाविहारी ( जगाला थक्क करून टाकणारी ) मति दे.
३ जे ( जी देवी ) सारीपाट खेळतांना फासे फेंकून उत्पन्न होणाऱ्या आनंदादि रसावर अवधान ( लक्ष ) देणारी अशी शंकरास भासते.
४ ती शिवा ( देवि ) आपल्या नामाक्षरासवेंच ( भक्तानें हाक मारतांच ) सावधान होऊन भक्तरक्षणास सज्ज होते.

---

१ मायामती = जीची ममत्वबुद्धि आहे अशी.
२ देवसुधाविहारी = देवांचें अमृत प्राशिणारी.
३ मा = आई.
४ शिवा = पार्वती, देवी.
५ अक्ष = सोंगट्या खेळावयाचे हस्तिदंती फासे.

# " यमक चित्र "

## ( समुद्गत )

३

सति-व्रता पावनि कामनास ॥
सतीव्र-तापा वनिका मनास ॥
स-तीव्र-तापावनि कामनास ॥
स-तीव्रता पाव निकामनास ॥ ६८ ॥

**खुलासाः—**

या सयमक चित्रांतील चारी ओळी सारख्या असल्यामुळें यास ' समुद्गत ' म्हणतात. यांतील शब्दांचे अनुक्रमानें अर्थ दिले आहेत, त्यावरून प्रत्येक चरणाचा अर्थ कळेल.

**शब्दार्थः—**

१ सति-व्रता = जिचें सतीचें व्रत आहे अशी. ( देवी. )
२ पावनि = प्रसन्न होणारी.
३ कामना = इच्छा.
४ वनिका = बाग.
५ अवनि = स्थान.
६ कामन = विषयी.
७ पाव = प्रसन्न हो ?
८ निकामन = नाहींसें करणें.

# " अर्धपादानुलोम-प्रतिलोम "

विभावशे ! विस्त्रवि शेव भावि ॥
विदे ! भला विस्त्रवि लाभ देवि ! ॥
दयानदी-कल्पक-दीन-याद ॥
खरा सदा कल्पक, दास राख ॥ ६९ ॥

**खुलासा:—**

प्रत्येक चरण उलट सुलट वाचला तरी त्याचें स्वरूप स्थिर राहतें.


**अर्थ:—**

१ हे प्रभावती ! भावि कल्याण वितर ( दे ) !
२ हे ज्ञानवती देवि ! चांगला लाभ दे ?
३ तुझ्या दयारूपी नदींतील मानिलेला मी एक दीन मत्स्य आहें.
४ खरोखर मी कल्पक ( तार्किक ) दास आहें, याचें रक्षण कर !

---

१ विभावशे = प्रभावती !
२ विस्त्रवि = देई.
३ शेव = सुख.
४ भावि = पुढील.
५ विदे ! = हे ज्ञानवती !
६ याद = मस्त्य.

# छत्र बंध




प्रकार १ ला.

जें सौंदर्य मनोज्ञ हे शुभमयी ! कैलासनाथेश्वरी !
गौरी, शंकरतोषिणी ! रमवुनी श्रीशंभुचित्ता हरी
तें काव्यीं बहु मन्मना स्फुरवितें मानोचिते! कालिके !
हानी ना हरि कोणि, हा कवि कृपाछत्रांत घे अंबिके ! ॥ ७० ॥

साध्यः– हे शंभुमनोहारिणी ! हा कवि कृपा–छत्रांत घे अंबिके !

( उभी व आडवी पट्टी पहा. )

# छत्र बंध





प्र० २ रा

अनुष्टुप— काली-दास 'कालिदास'। दुर्गा-प्रसाद पावला ॥

कालिके ! प्रार्थितों मीही। 'दुर्गाप्रसाद' पावलां ॥ ७१ ॥

# छत्र बंध




प्र० ३ ग.

**भुजंगप्रयात–**

**भजूं रीतिनीतीभरें चंडिकेला ।**
**व्यथाहारिणी योग्य माता स्तुतीला ॥**
**जपो सर्वदा लाभदात्रीस वाणी ।**
**भरी भव्यता भक्तकार्यीं भवानी ॥ ७२ ॥**


**साध्य**–शेवटचें चरण (आकृतींतील उभी पट्टी पहा ).

# हार बंध




जननीच तो सद्धर्मा । भृत्या शमवि चंडिका
जन नीच असत्कर्मा । त्या ती गमत चंडिका ॥ ७३ ॥

# मुरज बंध





## अनुष्टुप्

कामदा वरदा सर्वा । क्षेमदा ज्ञानदा सदा ॥
दास दान कदा इच्छो । ही सदा वरदायिनी ॥ ७४ ॥

**खुलासा:—**

कवितेच्या चार ओळी बंधाकृतींत आडव्या चार ओळींत वाचतां येतील शिवाय पहिली व चौथी ओळ अनुक्रमानें V या व Λ या त्रिकोणांत पहा ? तसेंच दुसरी व तिसरी ओळ अनुक्रमें ◊ या व ◊ या चौरसांत पहा.

# सारिपाट बंध




( अनुष्टुप् )

शिवे[1] ? जे करिती धावा । शिष्य पावति वैभवा ॥
शिवती ते न दुर्भावा । शिरती तरती भवां[2] ॥ ७५ ॥

**साध्यः**—प्रत्येक चरणाच्या आद्यंत वर्णानें 'शिवा' हे देवि—नाम साधिलें आहे.

---

१ देवि ! २ संसाराला.

# षोडशदलपद्म बंध.




( अनुष्टुप )

हा नमीन ज्ञानहीन । कनकानानि[१] नन्दन
हीन-दीन-जन-स्थान । तूं नवीन जनज्ञ न ॥ ७६ ॥

---

१ सुवर्णाप्रमाणें जिचें मुख आहे अशी.


# चतुर्दलपद्म बंध.




## वसंततिलक

गे ! मा ! सदा सदानें मी सु-पदांस लागे।
गेला सदा पदिं रमून, विहार या गे ! ॥
गे ! या रहावि मति, हा वर दे विदे ! गे !।
गे ! देवि ! दे, राचित-हेतुस दास मागे ॥ ७७ ॥

# अष्टदलकमल बंध




**चामर—**

कामदात्रि सिंदुरानना विदुष्ट-हारिका ।
कारिका विरश्चिका सुखार्थ वन्द्य कामुका ॥
का मुका अदक्ष तूं ? जप स्वनांत ' कालिका ' ।
' कालिका ' न माननीय सेवितात नाम का ? ॥ ७८ ॥

**साध्य—** ' सिंदुरवदना माता '. ( कमलदलाग्रावरील अक्षरें जुळवून पहा. )

# पंकज माला बंध




**स्रग्धरा**

कैलासाला ललामा समरमदमयी हेतुला तुष्टितुल्या
धीराशूरानरांही जयजयमय ती मानसानन्दनव्या
लाभालाभांत भासे मधुरधुनिघुरा शारदारङ्गरम्या
नाना हीना जनांना नवभवपवनीं तारका रम्यरङ्गा ॥ ७९ ॥

**साध्य:**– ‘कैलासमहेशाधीना जनमाता’ ( अनुक्रमें डावीकडील व उजवीकडील प्रत्येक कमलांतील वरील अक्षरें घेऊन तीं जुळवावीं )

# दीपमाल बंध




**( अनुष्टुप )**

सन्तप्त जो, सप्तशृंगीं । पावे सद्धोग शांतता ॥

जन तो वर्णितो प्रेमें । नग-वासिनी चंडिका ॥ ८० ॥

**साध्यः—** सप्तशृंगनगवासिनी चंडिका ' ( आकृतींतील उभी पट्टी पहा. )

# गृहचित्र बंध





( अनुष्टुप )

का मालिका वरी चंडी ?- चंण्डिकाकार मौण्डिका ॥
चारुमुंडा मोक्षदा ती-भली वानिति देवही ॥ ८१ ॥

**साध्यः**- ' कालिका ' ' चंण्डिका ' ' चामुण्डा ' ' भवानी '
( आकृतींतील दोन उभ्या व दोन आडव्या पट्टया पहा. )


# चक्र बंध



लक्षोनी मर्म देवी ! अरि जंव वधिला गर्जनारम्य वेगें ।
दैत्यानींहि स्वनादें नभ तंव भरिलें दैत्यसंमर्दिनी ! गे ॥
दोन्ही घोषांत गेला हरि–रव भरुनी तोहि मर्दी रिपूस ।
गे ! माते ? सुप्रभेनें अचलवर करी हा अजूनी प्रहास ॥ ८२ ॥

साध्यः–' महिषासुर–मर्दिनी, ( लहान वर्तुळांतील अक्षरें जुळवा )

# चतुरस्त्र चक्रबंध.




( अनुष्टुप )

हासती देवता हा ! हा ! 'हा ! हा !' ताप रिपूस हा ॥
हासपूर प्रभासे हा । हासे भानुमती[1] सहा[2] ॥ ८३ ॥

---

१ सूर्यानुषंगी. २ पृथ्वी.

# गोमूत्रिका बंध




( अनुष्टुप )

हा मातेहुनि रक्षावा यासि गे ! नीति शिक्षवी[1]
क्षमा पाहुनि रन्तावा[2] प्रासिद्धिनी ! वशि[3] स्तवी ॥ ८४ ॥

**साध्यः**— "माहुरवासिनी शिवी"

---

१ शिकव ! २ रमावा. ३ दास.

# गोमूत्रिका बंध.




( अनुष्टुप )


नीलालके ! ग्रीवा[1]-वत्क्र[2] । प्रिय-यज्या[3] करूं रिघे ॥
नीति-लम्बी ग्रीवा वर्णें प्रीतियत्नें कवी रिझे ॥ ८५ ॥

**साध्यः**– " नीलग्रीव–प्रियकरी " ( आकृतींतील मध्याक्षरें पहा. )

---

१ कंठ २ तोंड ३ पुजा.

# द्विचतुष्कचक्रबंध.



( अनुष्टुप )

नीलालके ! ग्रीवा-वत्क । प्रिय-यज्या करूं रिघे ॥
नीति-लम्बी ग्रीवा वर्णें । प्रीति-यत्नें कवी रिझे ॥ ८६ ॥

# अर्धभ्रमयमकचित्र.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गं | गा | ध | र | मो | द | दा | त्री |
| गा | तों | न | मु | नि | मो | क्ष | दा |
| ध | न | मा | नीं | हा | नि | मो | द |
| र | मु | नीं | ति | ज | हा | नि | मो |

( अनुष्टुप )

गंगाधर-मोददात्री । गातों नमुनि माक्षदा ॥

धन-मानीं हानि-मोद । रमुनी तिज हा निमो ॥ ८७ ॥

# गवाक्षबंध.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | न | | | | |
| | | | ति | ग | च | | | |
| | | या | न | त | दा | सा | | |
| | स | ते | म्र | न | हा | ई | घे | |
| न | ग | त | न | ये! | वा | रि | भ | यें |
| | तो | वि | क | वा | णी | ल्या | क | |
| | | क | लि | रि | पु | प्र | | |
| | | | न | भ | लो | | | |
| | | | | यें | | | | |

आर्या:-

नच गति या नत-दासा, घेई हा नम्रतेस नग-तनये ।
वारि भयें कल्याणी ! वाकवितो कलि-रिपु प्रलोभ-नयें ॥ ८८ ॥

साध्य- ' नगतनये ! वारि भयें ' ( आडवी व उभी पट्टी ).

# गवाक्षबंध.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग | | | |
| | | न | ज | ङ्गा | | |
| | प | दा | व | र्ता | तै | |
| णी | रि | का | द | न | नि | शी |
| त्व | त्स | मा | न | हो | ऊं | पा |
| | शै | न्ये | ज | रा | हे | |
| | | ल | नं | न्दि | | |
| | | | नी | | | |

( अनुष्टुप )

गङ्गा जनपदावर्ता । तेशी निनदकारिणी ॥
त्वत्समान होऊं पाहे । राजन्ये! शैलनान्दिनी ॥ ८९ ॥

**साध्यः**— ' गजवदन—जननी '.( उभी पट्टी पहा. )

# गृध्र बंध.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | म | द | | | |
| | | सी | सा | न | सं | | |
| | क्ष | दा | नी | ति | वि | हा | |
| रा | ज | रा | जे | श्व | री | स्म | री |
| | नि | न | रा | री | ती | री | |
| | | बा | ज | स्म | नें | | |
| | | | रा | री | | | |

( अनुष्टुप )

राक्षसी-मद संहारी, निजदासा न विस्मरी
बा ! नरा ! नीति-रीतीनें, राजराजेश्वरी स्मरी ॥ ९० ॥

साध्यः–'राजराजेश्वरी स्मरी' ( आकृतीमधील आडवी पट्टी पहा. )

# गृध्र बंध.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | म | हि | | | |
| | | र्ष | पू | ज | लो | | |
| | र्ध | सं | ता | प | नो | कां | |
| दु | र्गा | प्र | सा | द | र | चि | त |
| | दु | र्ति | ते | ना | क्षो | ता | |
| | | की | ज | शि | नी | | |
| | | | गा | नी | | | |

( अनुष्टुप )


दुर्धर्ष महि–लोकांत । दुर्गा संपूजनोचिता ॥
कीर्ति–प्रताप रक्षोनी गाजते सांद[1]–नाशिनी ॥ ९१ ॥

**साध्य**– दुर्गाप्रसाद–रचित ( मधली ओळ )

---

१ दुःख

# चक्रव्यूह-बंध.




युवा ! मना ! लाक्षिल मा ससांत ।
उगाच तूं कल्पक हीन-रीत ॥
तरी न ही कल्पक, तूंच गाउ ।
तसा समालक्षिल नाम-वायु ॥ ९२ ॥

१ सात=सुख .

॥ ॐ ॥

# नमश्चंडिकायै

( अष्टक )

## वर्णचित्र

सदाशीव शंभूस संतोषणारी ।
सदा सिंह-शूरासनीं शोभणारी ॥
सदाचार-संपन्न सत्प्रेम वाही ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९३ ॥

२

कृपाकारिणी कालिका कीर्तनीया ।
करीते कमी काळजी कंपनीया ॥
कथा-कीर्तनीं कालि-कीर्ती करावी ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९४ ॥

३

जगद्वंद्य जाज्वल्य ज्योतिर्विलासी ।
जगज्जीवनाची जिगीषा जियेसी ॥
जपानें जिच्या जाड्य जीर्णास जाई ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९५ ॥

४

ललाटांत लेखा लसे लाल लाल ।
लकाके लताहार लावण्य-लोल ॥
लळा लावणाऱ्या ललामेस लाही ।
नमश्चांडकायै नमश्चंडिकायै ॥ ९६ ॥

५

भवानी भ्रमानिष्टता भिंदणारी ।
भल्या भाविकांचीं भयें भंगणारी ॥
भरी भैरवी भद्रता भव्य भावी ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९७ ॥

६

दुराधर्ष दैत्यास दर्पावयाला ।
दया दीन दासांस दावावयाला ॥
दणाणी दिशा दैत्य-दंडांत दाही ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९८ ॥

७

रणोत्साहिनी राजराजेश्वरी ती ।
रिपूंच्या रची राशि रौद्रेय-रीती ॥
रणीं राजते रम्य रक्तानना ही ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ ९९ ॥

८

निवर्तून नक्तंचरांना निमाली ।
नभीं निर्जरी नाचती नृत्यतालीं ॥
नभश्री नटे निर्जरीनिर्जरांहीं ।
नमश्चंडिकायै नमश्चंडिकायै ॥ १०० ॥

समाप्त

नं. क. ३४५२

REFBK-0003442
REFBK-0003442